सं. फौजदारी खटला क्र. ४६८/२०१८

महाराष्ट्र सरकार –वि– चंद्रभान व इ.

निशाणी क्र. ३५

सरकार तर्फे साक्षीदार क्र.०१

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करते की,

माझे नावः हौसाबाई

पतीचे नावः गौतम

आडनावः खरात

माझे वयः ५३ वर्ष, व्यवसायः गृहीणी,

राहणारः आन्वी, ता. बदनापुर, जि. जालना.

**सरतपासणी सरकारी वकिल श्री. ए. एन. गवळी यांच्याद्वारे**

मला मराठी लिहता वाचता येत नाही. मी केवळ सही करते. मी घटनेवेळी मुंबई येथे राहण्यास होते. मी वालसा डावरगाव येथे नामदेव डांबेधर यांच्याकडून गट क्र.५१ मधील साडेतीन एकर क्षेत्र खरेदी केले आहे. सदरची जमीन माझ्या नावे आहे. दिनांक १०.०७.२०१८ रोजी आम्ही आमच्या शेतीमध्ये चक्कर मारण्यासाठी आलो असता आमच्या शेतातील मका व सरकीचे अंदाजे २०० ते २५० झाडांचे नुकसान झाल्याचे आम्ही पाहीले. त्याबाबत आम्ही आरोपींना विचारणा केली असता ते आम्हाला म्हणाले की, आमच्या बापजाद्याची जमीन आहे, आम्ही काहीही करु. आरोपींनी त्यानंतर आम्हाला मादरचोद अशी शिवीगाळ केली. तसेच आरोपींनी मला चापट–बुक्यांनी मारहाण केली. घटनेवेळी नारायण साबळे व बाबुराव साबळे उपस्थीत होते. त्यानंतर मी भोकरदन पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

०२. साक्षीदारास दिनांक ११.०७.२०१८ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. त्यामध्ये नमुद मजकुर बरोबर असल्याचे व त्याखाली सही केल्याचे साक्षीदाराने सांगितले. सबब सदरच्या फिर्यादीस **निशाणी क्र.३६** देण्यात येते.

०३. आरोपींनी आमचे अंदाजे ४० ते ५० हजार रुपयांचे नुकसान केले होते. पोलीसांनी चौकशी केली होती. आरोपी क्र.२ व ४ न्यायालयात हजर आहेत. उर्वरित आरोपी मयत आहेत.

सरतपास पुर्ण

**मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे उलटतपास थोड्या काळाकरीता तहकुब**

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

दिनांकः ०७.११.२०२५ (मयुरेश आर. काळे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. पी. टी. शिरसाठ यांच्याकडून**

०४. माझे माहेर मौजे वालसा डावरगाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा खटला दाखल करेपर्यंत गट क्र.५१ या मिळकतीमध्ये आरोपींचा ताबा होता. हे म्हणणे खरे आहे की, नामदेव डांबेधर हे माझे सावत्र काका आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीदेखील माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, नामदेव यास आम्ही दारुच्या आहारी नेऊन गट क्र.५१ ही मिळकत खरेदी केली. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताबाबत आरोपींना माहिती नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.५१ या मिळकतीस प्रचंड भाव आल्याने मी खोटेपणाने सदर मिळकतीची खरेदी केली.

०५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ ने प्रस्तुतचा खटला दाखल करण्यापुर्वी पोलीस ठाण्यामध्ये तक्रारी अर्ज दिला होता. हे मला माहित नाही की, आरोपींनी माझ्याविरुद्ध मी त्यांना शिवीगाळ केली म्हणुन तक्रारी अर्ज दिला होता अगर कसे? हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला पोलीस ठाण्यात बोलवले होते व मी मुंबई येथून आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी तक्रारी अर्ज दिल्याचा मला राग आला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या रागातून मी खोटी फिर्याद दाखल केली.

०६. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी शोभाबाई घाणेवाडी येथे राहण्यास आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सुशिलाबाई ही तिच्या माहेरी कोदोली येथे राहते. माझ्या सरतपासामध्ये नमुद मजकुर की, 'मादरचोद' अशी शिवी मी पोलीसांना सांगितली होती. साक्षीदारास फिर्याद वाचुन दाखविण्यात आली. त्यामध्ये सदरचा मजकुर नमुद नसल्याचे साक्षीदाराने सांगितले. मी पोलीसांना माझे किती नुकसान झाले हे देखील सांगितले.होते. सदरचा मजकुर फिर्यादीमध्ये नमुद नसण्याचे कारण मी सांगु शकणार नाही.

०७. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीखाली मी केवळ सही केली. हे म्हणणे खरे

आहे की, फिर्यादीमध्ये नमुद मजकुर मला माहित नाही. साक्षीदार सांगते की, माझ्या पतीला माहित आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ माझ्या पतीच्या सांगण्यावरुन प्रस्तुतचा खटला दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, शिवीगाळ केल्याचे व आरोपींनी धमक्या दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा गट क्र.५१ मध्ये ताबा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

दिनांकः ०७.११.२०२५

(मयुरेश आर. काळे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन